# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १८१ वा गुरूवार दि.०२ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.





# अभय योजनेला मिळाली मुदतवाढ



मुंबई : बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजना २०२४ ला ग्राहकांच्या मागणीनुसार ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

राज्यातील महावितरणच्या ३१ मार्च २०२४ पर्यंत पुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांसाठी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा कालावधी ३० नोव्हेंबर रोजी संपल्यानंतर ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु राज्यातील ग्राहकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन ही योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणा-या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.

## मित्र परिवाराच्या वतीने अनिल कांबळे व अशोक हानवते यांचा वाढदिवस साजरा



लातूर :- स्वामी विवेकानंद पोलीस ठाण्यात कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक श्री अनिल कांबळे व जेष्ठ पत्रकार दैनिक महावृत चे संपादक अशोक हानवते यांचा सुरेश अन्ना वाघमारे ,लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे बहुजन समाज पार्टी जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी ,भीम आर्मीचे मराठवाडा अध्यक्ष विनोद भाऊ कोल्हे ,लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे सचिव बाबासाहेब बनसोडे रूपेश गायकवाड,माथाडी कामगार नेते माणिक अन्ना पड़ोले ,सचिन कांबले , सोनकंबळे यांच्या हस्ते शॉल पुष्पहार , पुष्पगुच्छ देऊन केक कापून शुभेच्छा देत वाढदिवस साजरा करण्यात आला



दैनिक महावृत्तचे संपादक आमचे स्नेही मित्र अशोक हानवते सरांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना हॉईस ऑफ मीडिया चे डिजिटल विंगचे अध्यक्ष डॉ.सितम सोनवणे, समवेत हॉईस ऑफ मीडिया लातूर चे अध्यक्ष तथा दैनिक सारथी समाचार चे संपादक संगम कोटलवार आदी मित्र परिवार उपस्थित होते.

## प्रधानमंत्री आवास योजना २.० साठी ऑनलाईन अर्ज करावेत; महानगरपालिकेचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी : प्रधानमंत्री आवास योजना २.० ही सुरू झाली असून त्यासाठी इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन लातूर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

ज्या नागरिकांकडे स्वतःची जागा आहे परंतु घर नाही किंवा ज्यांचे घर कच्चे आहे अशा नागरिकांना या योजनेचा लाभ दिला जातो. यासाठी लाभधारकाचे वार्षिक उत्पन्न साडेचार लाख रुपये पर्यंत असणे आवश्यक आहे. यासाठी शासनाकडून अडीच लाख रुपयांचे अनुदान टप्प्याटप्प्याने देण्यात येते. यात लाभधारकाने शौचालयासह ३० चौरस मीटरचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका हद्दीतील ज्या लाभधारकांना या योजनेसाठी अर्ज करावयाचा आहे त्यांनी हीींिि://ाशिूळी.सीीं.ळप/ झच-धचखड२२०२४/झच-धुडणठतएध/ एश्र्ळसळलश्र्ळीूंउहशलज्ञ.रीि यावेबसाईट किंवा सेतू केंद्रावर जाऊन अर्ज सादर करावा.अर्जा सोबत आधार कार्ड,कुटुंबातील सदस्यांच्या आधार कार्डचे तपशील, अर्जदाराचे आधारशी जोडले असणारे बँक खाते क्रमांक, बँकेचे नाव, शाखा, आयएफएससी कोड, उत्पन्नाचा दाखला,एस सी,एसटी किंवा ओबीसी असतील तर जात प्रमाणपत्र, जमिनीचे दस्तऐवज अर्थात सिटी सर्वे उतारा किंवा सातबारा, प्लॉटिंग उताऱ्यासोबत बिनशेती आदेश व बिनशेती लेआउट आणि महानगरपालिका आठ अ उतारा या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रति वेबसाईटवर अपलोड करणे आवश्यक आहे. या कागदपत्रांची पूर्तता करून इच्छुकांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

**५१९५ घरकुलांना मंजुरी...**

लातूर मनपा हद्दीत मागील ६ वर्षांपासून प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आजपर्यंत ५१९५ घरकुलांना मंजुरी मिळाली असून त्यापैकी ३५६० घरकुले बांधण्यात आली आहेत. उर्वरित घरकुलांची कामे प्रगतीपथावर असल्याची माहितीही आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिली.

# पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या मध्यस्थीने जल समाधी आंदोलन मागे

### फरार आरोपींना १० दिवसांत अटक करण्याची पोलीस अधीक्षकांची ग्रामस्थांना ग्वाही



केज/प्रतिनिधी पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या मध्यस्थीने जल समाधी आंदोलन मागे घेण्यात आले. फरार आरोपींना १० दिवसांत अटक करण्याची पोलीस अधीक्षकांनी ग्रामस्थांना ग्वाही दिली आहे. मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मोठी खळबळ निर्माण झाली. बीडमध्ये सर्वपक्षीय आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आता मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक होताना दिसत आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार तीन आरोपींना तात्काळ अटक करा. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन व पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांच्यासह दोषी पोलिसांना तात्काळ बडतर्फ करून त्यांना ३०२ च्या गुन्ह्यामध्ये सह आरोपी करण्यात यावेत. संतोष देशमुख हत्येप्रकरणी गावकऱ्यांनी परिसरातील तलावात जलसमाधी आंदोलन सुरू केले. यानंतर जवळपास दोन ते तीन तास महिला पाण्यामध्ये आंदोलन करत होत्या त्यामुळे महिलांनी तब्येत खराब झाली यामध्ये वृद्ध महिलांना चक्कर येऊन पाण्यात पडल्या त्यानंतर एका महिलेला पोलिसांच्या गाडीमध्ये उपचारा करतात नेण्यात आले तर दोन महिलांना म्बुलन्स मध्ये नेण्यात आले. जल आंदोलन ठिकाणी पोलिस अधीक्षक पोहोचले. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली आणि पोलिस अक्षीक्षकांच्या मध्यस्थीनंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले. या आंदोलनामध्ये पुरुषांसह महिलाही मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. हे आंदोलन दोन ते तीन तास सुरू होते. तरूण आणि महिला देखील या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.वाल्मिक कराडच्या सुनावणीवेळी केज कोर्टाबाहेर हायव्होल्टेज ड्रामा, पोलिसांनी केला लाठीचार्ज, मोठ्या घडामोडीदोन तास सुरू असलेल्या आंदोलनाला पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी भेट दिल्यानंतर गावकऱ्यांनी हे आंदोलन मागे घेतले. यावेळी कॉवत यांना महिलांनी जाब विचारत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. यावेळी पोलीस अधीक्षक यांच्यासमवेत चर्चा करत असताना महिला म्हणाल्या की, आरोपीला केज येथील न्यायालयात हजर केले असता त्या ठिकाणी १०० पोलीस तैनात करण्यात आले होते परंतु आमच्या या आंदोलनाच्या ठिकाणी आमच्या महिला बेशुद्ध पडले असता एकही पोलीस कर्मचारी पाण्यात उतरला नाही व आमच्या व्यथा समजून घेऊ शकला नाही त्याचबरोबर केज पोलीस हे आम्हाला न्याय देत नाहीत त्यामुळे आमचा केज पोलिसांवर विश्वास नाही असा आरोप केज पोलिसांवर महिलांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे केला आहे. या ठिकाणी पोलीस प्रशासनाच्या वतीने तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता तर केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे हे त्यांच्या कर्मचाऱ्यासह तळ ठोकून होते. त्याचबरोबर आरोग्य विभागाचे डॉक्टर आणि कर्मचारी हेही उपस्थित होते. ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षकांच्या विनंतीला मान देऊन तात्पुरत्या स्वरूपात आंदोलन मागे घेतले आहे जर दहा दिवसात आरोपींना अटक करून ग्रामस्थांच्या मागण्या पूर्ण न केल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील ग्रामस्थांनी प्रशासनाला यावेळी दिला आहे.

## व्हाईस ऑफ मिडीयाच्या लातूर जिल्हाध्यक्ष पदी संगम कोटलवार यांची बिनविरोध निवड



लातूर–व्हाईस ऑफ मिडीया लातूर जिल्हाध्यक्षपदासाठीची निवडणूक २०२४–२५ ची प्रक्रिया नुकतीच पार पडली. या निवडणूक प्रक्रियेमध्ये लातूर जिल्हाध्यक्ष पदासाठी दै.सारथी समाचारचे संपादक संगम कोटलवार यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे निवडणूक अधिकारी अजित कुंकुलोळ यांनी संगम कोटलवार यांनी लातूर जिल्हाध्यक्ष पदी बिनविरोध निवड केली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल व्हाईस ऑफ मिडीयाचे अध्यक्ष संदिप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, मुख्य संयोजक योगेंद्र दोरकर, प्रदेश उपाध्यक्ष अजित कुंकुलोळ प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडिया, बालाजी फड, शहाजी पवार, बाळासाहेब जाधव, श्रीराम जाधव, आनंद माने, सचिन चांडक, सुभाष सगर, योगीराज पिसाळ, विनोद चव्हाण यांच्यासह पदाधिकार्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



सांज दैनिक सारथी समाचार संपादक संगम कोटलवार, अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त या दोघांचा वाढदिवस साजरा करीत असताना सर्व पत्रकार मित्र दिसत आहेत.

## संपादकीय....

# भविष्यात लाभदायक

मध्य प्रदेश, राजस्थान यादरम्यान वाहणार्या पार्वती, कालीसिंध आणि चंबळ नद्यांचे पाणी मोठा जलस्रोत म्हणून पाहिले जाते. या नद्यांना जोडण्यासाठी अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूमिपूजन केले. याचे प्रतीक म्हणून तिन्ही नद्यांचे पाणी एका कलशात भरले. यानंतर भारत सरकार, राजस्थान आणि मध्य प्रदेश सरकार यांच्यात त्रिपक्षीय करार झाला. या प्रकल्पावर ७२ हजार कोटी रुपये खर्च होण्याची अपेक्षा आहे आणि त्यात ९० टक्के रक्कम केंद्र सरकार देईल. यामुळे मध्य प्रदेशातील १३ जिल्ह्यांतील ३,२१७ गावांचा चेहरामोहरा बदलणार आहे.

दोन्ही राज्यांत २८ नवीन धरणे उभारण्यात येणार असून चार जुन्या धरणांची साठवण क्षमता वाढविली जाईल. त्याचबरोबर सध्याच्या चंबळ कालवा प्रकल्पाचा जीर्णोद्धार केला जाईल. या नद्या ठराविक वेळेत एकमेकांना जोडल्यास कृषी भूमी ओलिताखाली येण्याचे प्रमाण वाढेल आणि साहजिकच अन्नधान्याचे उत्पादन वाढेल. २००४ सालात कावेरी नदी जलतंटासंबंधी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार केंद्र शासनाने राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाचा तपशील जाहीर केला आणि ही योजना कार्यान्वित करण्यासाठी सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी गट स्थापन केला होता.

अर्थात, त्याचा प्रारंभ केन–बेतवा नदीजोड प्रकल्पाने केला होता. या योजना जलशक्ती अभियान ‘कॅच द रन’ या अभियानांतर्गत राबविल्या जात आहेत. पूर आणि दुष्काळाने त्रस्त या देशात नदीजोड प्रकल्पाला यश आले तर ५७ अन्य नद्या जोडण्याचा मार्ग देखील मोकळा होईल. वास्तविक हवामानबदल आणि बदलणारे पावसाचे वेळापत्रक पाहता नद्यांतील पुराचे पाणी अडविण्याचे काम करणे आवश्यक आहे. हे पाणी दुष्काळग्रस्त भागातील कालव्यात सोडले जाईल. वास्तविक भारतात जगातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे १८ टक्के नागरिक राहतात आणि यासाठी पिण्यायोग्य पाणी केवळ चार टक्के आहे. अर्थात, पर्यावरणवादी या प्रकल्पाला विरोध करत आहेत. नदीजोड प्रकल्पामुळे त्यांचा प्रवाह थांबेल आणि त्या कालांतराने इतिहासजमा होतील अशी भीती व्यक्त होत आहे.


नर्मदा आणि क्षिप्रा नद्यांना जोडण्याचे काम तत्कालीन मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सुरू केले होते. या दोन्ही नद्या मध्य प्रदेशमध्ये वाहत असल्याने त्यांना जोडणे शक्य झाले. तसेच केन आणि बेतवा नद्यांना जोडण्याची तयारी मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश सरकार पूर्वीपासूनच करत होते. या प्रकल्पाला २००५ मध्ये मंजुरी मिळाली. मात्र पाणी वाटपावरून वाद झाला. कालांतराने राजकीय स्थिती बदलली आणि प्रकल्पावर मतैक्य झाले. केन नदी जबलपूरजवळील कैमूरच्या पर्वतरांगात उगम पावत ती ४२७ किलोमीटर उत्तरकडे वाहत जाते आणि नंतर ती बांदा जिल्ह्यातील हमीरपूर येथे यमुनेला मिळते. केन बेतवा नदीजोड प्रकल्पावर धरणांची उभारणी आणि कालव्याचे काम सुरू झाले आहे.

दक्षिणेतील महासागर, नदी आणि सरोवरात मोठा जलसाठा आहे; परंतु मानवासाठी जीवनदायी असलेले पाणी आणि वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्धतेचे बिघडणारे गणित पाहता चिंतेत भर पडत आहे. अशावेळी वाढत्या तापमानामुळे हिमकडे वितळण्याच्या घटना घडत आहे. शिवाय पाऊस न झाल्याने आटत जाणार्या जलस्रोतांची संख्याही वाढत आहे. सध्याच्या काळात पाण्याचा वापर कृषी, विद्युत आणि पेयजलच्या रूपातून सर्वाधिक केला जात आहे. अर्थात पिण्यासाठी पाण्याचा वापर केवळ आठ टक्के असून त्याचा प्रमुख स्रोत नदी आणि भूजल आहे. औद्योगीकरण, शहरीकरण आणि वाढत्या लोकसंख्येच्या दबावामुळे एकीकडे नद्यांचा आकार कमी होत आहे, त्याचवेळी औद्योगिक कचरा आणि सांडपाणी सोडले जात असल्याने गंगा, यमुना नद्या प्रदूषित होत आहेत.

हिमालय भागातील नद्यांचे अतिरिक्त पाणी संकलित करण्याच्या दृष्टीने भारत, नेपाळमध्ये गंगा, यमुना, ब्रह्मपुत्र तसेच त्यांच्या उपनद्यांचा मोठा जलाशय उभारण्याची तयारी केली जात आहे. यानुसार पावसाचे पाणी जमा केले जाईल आणि उत्तर प्रदेश, बिहार आणि आसामची भयंकर पुरापासून सुटका मिळेल. या जलाशयापासून वीज निर्मिती केली जाईल. या क्षेत्रात कोसी, घाघरा, मेच, गंदक, साबरमती, शरदा, ङ्गरक्का, सुंदरबन, स्वर्णरेखा आणि दामोदर नद्यांना गंगा, यमुना आणि महानदीला जोडले जाईल. सुमारे १३ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या या नद्या भारतातील संपूर्ण सखल भागात वाहतात.

त्याचवेळी २ हजार ५२८ लाख हेक्टर जमीन आणि वनजमिनीतून वाहणार्या या नदीत प्रतिव्यक्तीसाठी ६९० घनमीटर पाणी उपलब्ध आहे. कृषीयोग्य ५४६ लाख हेक्टर जमिनीत याच पाण्यातून सिंचन होते. नद्याच्या महापुराचे पाणी गोळा करून त्याला दुष्काळग्रस्त भागातील कालव्यामार्ङ्गत सोडण्याची योजना आहे. अशावेळी पिण्याच्या पाण्याची समस्या कमी होईल आणि सिंचनासाठी पुरेसे पाणी मिळेल. म्हणूनच नदी जोड प्रकल्प हे भविष्यासाठी लाभदायी मानले जात आहेत.

# बिहार सोडणार्‍यांची संख्या लक्षणीय



बिहारमध्ये पुढच्या वर्षी होणार्या विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी राजकीय डावपेच आखण्यास सुरुवात केली आहे. झारखंडमध्ये हेमंत सोरेन आणि महाराष्ट्रात महायुतीच्या विजयात महिलावर्गाचा मोठा वाटा राहिला आहे. त्यानंतर आता बिहारमध्ये देखील महिलांच्या मतपेढीवरून लढाई सुरू झाली आहे. यादरम्यान बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी घोषणा करत बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलाचे सरकार आल्यास राज्यातील महिलांना दरमहा अडीच हजार रुपये आर्थिक मदत दिली जाईल, असे जाहीर केले.

राजकीय तज्ज्ञांच्या मते, केवळ जातीय समीकरणांच्या आधारे निवडणुकांचा आणि जनमताचा लोलक आपल्या बाजूने ङ्गिरवता येणे शक्य नाहीये याची जाणीव तेजस्वी यादवांसह सर्वच विरोधकांना झाली आहे. जातीय समीकरणांबरोबरच ‘आधी आबादी’ असणार्या महिलांचा विचार प्राधान्याने केल्याशिवाय गत्यंतर नाही, हेदेखील महाराष्ट्र, झारखंड, मध्य प्रदेश, कर्नाटक या राज्यांतील निवडणूक निकालांनी स्पष्ट केले आहे. म्हणून विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी महिला वर्गांना आकर्षित करण्यासाठी राजदने प्रयत्न सुरू केले आहेत. तेजस्वी यादव यांच्या घोषणेनंतर मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी सुरू केलेली ‘महिला संवाद यात्रा’ त्यास प्रत्युत्तर मानले जात आहे.

राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी म्हटले की, राजदचे सरकार आल्यास राज्यातील भगिनी आणि मातांसाठी ‘माई–बहन’ योजना सुरू केली जाईल. यानुसार आर्थिक रूपातून कमकुवत महिलांना सरकारकडून अडीच हजार दरमहा दिले जातील. सरकार स्थापन झाल्यानंतरच महिनाभरातच ही योजना कार्यान्वित केली जाईल, माता आणि भगिनींच्या अडचणी दूर करण्यासाठी राजद सरकारकडून प्रयत्न केले जातील आणि तुमचे प्रश्न ते आमचे प्रश्न असतील. राज्यातील निम्म्या लोकसंख्येला न्याय द्यावा लागेल आणि सामाजिक न्यायाबरोबरच आम्ही आर्थिक न्याय देण्याचा देखील प्रयत्न करू, असेही यादव म्हणाले.

लोकसभा निवडणुकीच्या निकालातील धक्क्यातून सावरेपर्यंत अलीकडेच झालेल्या बिहार विधानसभा पोटनिवडणुकीमध्ये चार जागांवर राजदला मोठा धक्का बसला आहे. लोकसभा निवडणुकीत राजदला किमान चार जागांवर तरी विजय मिळाला होता; पण विधानसभा पोटनिवडणुकीत पक्षाला भोपळाही ङ्गोडता आलेला नाही. पक्षाचा गड मानल्या जाणार्या मतदारसंघातही राजदला पराभवाचे तोंड पाहावे लागले.

बिहारमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या कमी आहे; परंतु महिलांचा मतदान करण्याचा टक्का पुरुषांपेक्षा अधिक आहे. या राज्यात दर हजार पुरुष मतदारांमागे महिला मतदारांची संख्या ९०७ इतकी आहे. परंतु मतदानातील सहभागाचा विचार करता महिलांचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकांमध्ये बिहारमध्ये एकूण ५६.२८ टक्के मतदान झाले. यामध्ये ५३ टक्के पुरुष आणि ५९.४५ टक्के महिला मतदारांनी मतदान केले. म्हणजेच पुरुषांच्या तुलनेत मतदान करणार्या महिलांचे प्रमाण ६.४५ टक्के अधिक होते. २०१९ मध्ये पार पडलेल्या बिहारमधील विधानसभा निवडणुकांमध्ये एकूण मतदारांची संख्या ७ कोटी १२ लाख १६ हजार २८६ इतकी होती. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ३.७६ कोटी तर महिला मतदारांची संख्या ३.३५ कोटी इतकी होती. त्यावेळी विधानसभेला ५७.३३ टक्के मतदान झाले. यामध्ये पुरुषांची मतदानाची टक्केवारी ५४.९० टक्के होती; तर महिलांचे मतदानाचे प्रमाण ५९.५८ टक्के होते.

बिहारमध्ये महिला मतपेढीवर मुख्यमंत्री नितीशकुमार यांची चांगली पकड आहे. तज्ज्ञांच्या मते, त्यांच्या विजयात महिला मतदारांचा मोठा हात राहिला आहे. बिहारचे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना नितीशकुमार यांनी २००५ मध्ये नगर पंचायतींमध्ये महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. याखेरीज मुलींना सायकल देण्याच्या त्यांच्या योजनेची देशभर चर्चा झाली होती. राज्यातील मुली आणि महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना सुरू केल्या. विद्यार्थिनींना आर्थिक मदत देणारी योजना राबवली. महिला बचत गटांच्या मागणीवरून २०१६ मध्ये बिहारमध्ये दारूबंदीही त्यांनी केली. अनेक योजनांची चांगली अंमलबजावणी केल्यामुळे नितीशकुमारांची महिला व्होटबँक भक्कम बनत गेली.

या सर्वांचे आकलन करून राजदने महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रस्तावित योजना आणली आहे. बिहारच्या विविध भागात राजदचे नेते दौरे काढत आहेत. या दौर्यांमधून बिहार सरकारच्या उणिवांवर प्रकाश टाकण्याचे काम केले जात आहे. पण मुख्य लक्ष्य आहे ते महिला मतदारांवर.

दुसरीकडे, मुख्यमंत्री नितीशकुमार यांनीही आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संवाद यात्रा आरंभली आहे. या यात्रेवर टीका करताना तेजस्वी यादव यांनी मुख्यमंत्री दोन अब्जापेक्षा अधिक खर्च करत असल्याचा आरोप केला. ही रक्कम अनाठायीपणे खर्च केली जात आहे असे म्हटले आहे. तसेच निती आयोगाचा अहवाल पाहिला तर बिहार सोडून जाणार्यांची संख्या अजूनही लक्षणीय आहे आणि यात बिहार पहिल्या क्रमाकांवर आहे.

बेरोजगारीच्या बाबतीत बिहार पहिल्या स्थानावर आहे. त्यामुळे एवढ्या सधन राज्यातून लोकांना बाहेर का जावेसे वाटते, याचा विचार करायला हवा, असाही टोला त्यांनी लगावला. राबडीदेवी या बिहारच्या पहिल्या आणि एकमेव महिला मुख्यमंत्री होत्या; परंतु बिहारची जनता अजूनही लालूप्रसाद यादव, राबडीदेवी यांच्या पंधरा वर्षांची राजवट विसरलेली नाही. त्यामुळे तेजस्वी यादवांच्या घोषणांचा कितपत उपयोग होईल याबाबत साशंकता आहे. सत्तेत येण्यासाठी तेजस्वी यादव यांनी यापूर्वी मुस्लीम–यादव मतांवर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला आणि आता ते रोख निधी हस्तांतर योजनांबरोबरच महिला मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. १९९० च्या दशकांत लालूंच्या कुटुंबाने बिहारवर राज्य केले आहे.

नितीशकुमारदेखील मध्य प्रदेशची ‘लाडली बहन योजने’च्या आधारावर बिहारमध्ये महिलांसाठी योजना लागू करण्याच्या विचारात आहेत. या योजनेनुसार १८ ते ५० वर्षे वयोगटातील महिलांना दरमहा हजार रुपये देण्याचा विचार आहे. शिवाय स्वयंसहायता समूहाशी संबंधित महिलांसाठी निर्णय घेतले जाऊ शकतात. २०१५ मध्ये नितीशकुमार यांच्या सरकारने बिहारमध्ये स्वयं साहाय्यता समूहाची स्थापना केली होती. सध्या राज्यात ११ लाख समूह सक्रिय आहेत. प्रत्येक समूहात दहा महिला आहेत. सरकार या समूहांना दिलेले कर्ज माङ्ग करण्याचा विचार करत आहे. असा निर्णय घेतल्यास त्याचा थेटपणे लाखो महिलांना लाभ मिळणार आहे.

एकंदरीत बिहारची यंदाची निवडणूक आणि त्यापूर्वीची राजकीय रणधुमाळी ही पूर्णतः महिलाकेंद्री असणार हे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्र, झारखंड, मध्य प्रदेश, कर्नाटक, दिल्ली आणि आता बिहार असे करत करत संपूर्ण देशाच्याच राजकारणामध्ये महिला केंद्रस्थानी येत आहेत, हे एक परिवर्तनच म्हणायला हवे.

# कार्यवाही समर्थपणे व्हावी




गेले काही दिवस महाराष्ट्रभर सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि त्या हत्येचा संशय असलेला वाल्मिक कराड आणि त्याचे साथीदार तसेच पडद्यामागचे सूत्रधार हा विषय खूप गाजतो आहे. संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या झाली आणि ३१ डिसेंबर रोजी या हत्या प्रकरणात ज्यांची प्रामुख्याने चर्चा सुरू आहे तो वाल्मिक कराड नावाचा इसम पुण्याचे सीआयडी मुख्यालयात तपास यंत्रणेपुढे शरण आला. प्रत्यक्ष हत्या घडल्यानंतर सुमारे २० ते २२ दिवस महाराष्ट्रभर या विषयाने खळबळ माजली. केवळ विधानसभेतच नव्हे तर देशाच्या संसदेत याविषयी चर्चा केली गेली. यातील चार आरोपींना अटक झाली असली तरी वाल्मिक कराड यासह अन्य तीन प्रमुख आरोपी आतापर्यंत फरारी होते. या प्रकरणातील आरोपींना अटक करा, या मागणीसाठी लाखोंचे मोर्चे निघाले. प्रसारमाध्यमांनीही हा विषय लावून धरला. तरीही वाल्मिक कराड राज्याच्या पोलीस यंत्रणेला सापडू शकत नव्हता. शेवटी हा तपास सीआयडीकडे देण्यात आला.

सीआयडी आणि पोलिसांची म्हणे १८ पथके आरोपींच्या शोधासाठी तैनात केली गेली होती. पण वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदाराचा मागूस लागत नव्हता. हे सगळे प्रकरण रहस्यमय पातळीवर गेले होते. यातले काही मुद्दे विलक्षण चक्रावून टाकणारे आहेत. या वाल्मिक कराडला पोलीस संरक्षण होते. ११ डिसेंबर रोजी वाल्मिक कराड याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला. त्यानंतरही चार दिवस म्हणजे १५ डिसेंबरपर्यंत तो म्हणे पोलीस संरक्षणातच फिरत होता. पोलीस संरक्षणात फिरणारा माणूस पोलिसांना सापडत नाही ही अजबच तर्हा या राज्यात पहिल्यांदा पाहायला मिळाली. त्यानंतर तो पोलिसांना तर सोडाच पण सीआयडीलासुद्धा सापडू शकत नव्हता. आज मात्र तो आरामात स्वतः चे नगरसेवक समर्थक आणि कार्यकर्त्यांसमवेत एखाद्या बादशहाच्या थाटात सीआयडी मुख्यालयात स्वतःहून हजर झाला. राज्यभर ज्याची चर्चा होती तो आरोपी पोलिसांना न सापडल्यानंतर तो स्वतःहून शरण येणे ही बाब राज्यातल्या कायदा सुव्यवस्था सांभाळणार्या यंत्रणेला निश्चितच भूषणावह नाही. त्याच्या शरणागतीवर राजकीय वर्तुळातून अनेक प्रतिक्रिया आल्या आहेत.

ही शरणागती नसून एक प्रकारचे सेटिंग होते असा आरोप जितेंद्र आव्हाड, अंजली दमानिया वगैरे लोकांनी केला आहे. भास्कर जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार काल धनंजय मुंडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथी गृहावर प्रदीर्घ चर्चा झाली आणि आज वाल्मिक कराड सीआयडीसमोर शरण आला हे दोन संदर्भ एकमेकांशी नीट जुळवले तर त्यातून बरेच निष्कर्ष निघू शकतात असे भास्करराव जाधवांचे म्हणणे आहे. वाल्मिक कराड हे एकुणातच अजब रसायन आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या कार्यालयातील एक साधा कर्मचारी अशी त्याची प्रारंभिक ओळख होती. त्यानंतर जेव्हा धनंजय मुंडे यांनी गोपीनाथराव मुंडे यांच्यापासून फारकत घेतली तेव्हापासून तो धनंजय मुंडे यांची साथसंगत करीत राहिला आहे. त्यांच्याबरोबर राजकीय क्षेत्रात त्याने प्रदीर्घ वाटचाल केली आहे.

बीड परिसरातील अनेक गुन्ह्यांमध्ये त्याचा हात असल्याचा नुसता आरोपच नव्हे तर त्याच्यावर त्या अनुषंगाने गुन्हेही दाखल झालेले आहेत. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर धनंजय मुंडे यांच्या आशीर्वादानेच तो या कारवाया करीत राहिला आहे असे अनेक आमदारांचे म्हणणे आहे. आजवर आपण बिहार आणि उत्तर प्रदेशातील बाहुबली राजकीय नेत्यांच्या कथा ऐकत आलो होतो, पण तेच कथानक बीडमध्ये वर्षानुवर्षे चालू होते त्याला कुठेच वाचा फुटत नव्हती. अखेर संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येनंतर या सगळ्या कारनाम्याला वाचा फुटली आहे. अजूनही देशमुख हत्या प्रकरणातील तीन आरोपी फरारच आहेत. आमदार सुरेश धस यांनी विधानसभेत संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा जो तपशील सादर केला, तो ऐकताना सारे सभागृह अवाक झाले होते.

एका आमदाराच्या म्हणण्यानुसार सुरेश धस आणखी पाच मिनिटे जर अधिक बोलले असते तर सभागृहातच आमदार ढसाढसा रडले असते इतकी या हत्येची कहाणी करुण आहे. इतक्या क्रूर आणि सनसनाटी प्रकरणाला थेट विधानसभेत वाचा फुटल्यानंतर यातील आरोपी दोन–तीन दिवसातच गजाआड व्हायला हवे होते. पण त्यासाठी तब्बल २० ते २२ दिवसांचा अवधी लागला आहे. त्यानंतरही मुख्य आरोपीला पोलीस पकडू शकले नाहीत तर तो स्वतःहून शरण येऊन जणू काही तपास यंत्रणेवर आपण उपकारच करीत आहोत अशा अविर्भावात वाल्मिक कराड सीआयडी पुढे प्रकटला आहे. त्यातही हाइट म्हणजे शरणागतीपूर्वी या कराडने स्वतःचा एक व्हिडिओ संदेश जारी करून संतोष देशमुख हत्या प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्यांना फाशी द्या, अशी मागणी केली आहे, आपल्यावर केवळ खंडणीचा गुन्हा दाखल आहे आणि या प्रकरणात अटकपूर्व जामीन घेण्याची संधी असतानासुद्धा आपण ती न घेता चौकशीसाठी हजर राहणार आहोत आणि याची निष्पक्ष चौकशी झाल्यानंतर न्यायालय जी काही शिक्षा देईल ती आपण भोगायला तयार आहोत असे निवेदन त्याने दिले आहे.

हे सगळेच प्रकरण आणि त्याच्या तपासात झालेली चालढकल हे राज्याच्या गृहखात्यालाही शोभणारे नाही. वाल्मिक कराड आणि त्याच्या गुन्हेगारी कृत्यांचा जो तपशील या मधल्या काळात प्रसारमाध्यमातून समोर आला तो इतके दिवस कसा दडपला गेला हाच मुख्य प्रश्न आहे. कोणाच्या आशीर्वादाखाली कराड आणि त्यांच्या साथीदारांची ही सारी कृत्ये सुरू होती, त्या सूत्रधारालाही गजाआड केले पाहिजे ही मागणी जोर धरत आहे. यात सर्वपक्षीय राजकीय नेत्यांनी थेट राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव घेतले आहे. त्यामुळे अर्थातच मुंडे यांच्याभोवती संशयाचे दाट धुके निर्माण झाले आहे. त्यामुळे कराड प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत आणि त्याचा कोर्टात निकाल लागेपर्यंत धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदापासून दूर राहावे आणि निष्पक्ष चौकशीला मदत करावी, अशी मागणी सर्वच बाजूंनी होते आहे. मराठवाडा परिसरातील जनतेचा प्रक्षोभ आणि या प्रकरणी राज्यभरातून आलेल्या एकूणच प्रतिक्रिया पाहता धनंजय मुंडे हे ज्या पक्षातून येतात त्या पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी याप्रकरणी आता पुढाकार घेण्याची निकडीची गरज आहे. महाराष्ट्राला बीडमधल्या एकूणच गुन्हेगारी कथानकांनी जो डाग लागला आहे तो पुसून महाराष्ट्राचा लौकिक पुन्हा प्रस्थापित करणे ही विद्यमान राज्यकर्त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी ओळखून ते या पुढील कारवाई समर्थपणे करतील अशी अपेक्षा आहे.

# कोरियन महिलांप्रमाणे सुंदर त्वचेसाठी घरी तयार करा ‘हे’ खास पाणी, वयाच्या ७० मध्ये दिसाल अधिक तरुण

कोरियन महिला सुंदर आणि चमकदार त्वचेसाठी तांदळाच्या पाण्याचा वापर करतात. तांदळाच्या पाण्यामुळे त्वचेवरील घाण स्वच्छ आणि त्वचा हायड्रेट राहते. चला तर जाणून घेऊया त्वचेसाठी तांदळाचे पाणी कसे वापरावे.

जगभरातील सर्वच महिलांना कोरियन महिलांप्रमाणे सुंदर आणि चमकदार त्वचा हवी आहे. कोरियन महिलांचे स्किन केअर सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहे. कोरियन महिला सुंदर आणि चमकदार त्वचेसाठी तांदळाच्या पाण्याचा वापर करतात. या महिला त्वचेचे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी बाजारात मिळणाऱ्या महागड्या प्रॉडक्टवर किंवा इतर सौंदर्य उत्पादनावर विश्वास न ठेवतात, तांदळाच्या पाण्यावर अधिक विश्वास ठेवतात. सुंदर आणि गोरीपान त्वचा मिळवण्यासाठी महिला बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या प्रॉडक्टचा वापर करतात, मात्र तरीसुद्धा त्वचेवर काहीच फरक दिसून येत नाही. अशावेळी तुम्ही सुद्धा घरगुती उपाय करून त्वचेचे सौंदर्य अधिक वाढवू शकता.(फोटो सौजन्य- )



सुंदर त्वचेसाठी नैसर्गिक पदार्थांचा वापर केल्यास त्वचा अधिक सुंदर आणि चमकदार होईल.त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सुंदर त्वचेसाठी तांदळाच्या पाण्याचा वापर कसा करावा? आणि तांदळाच्या पाण्याचे त्वचेला काय फायदे होतात? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

कोरियन महिलांच्या त्वचेचे रहस्य:

कोरियन महिला सुंदर त्वचेसाठी तांदळाच्या पाण्याचा वापर करतात. त्वचेचे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी तांदळाच्या पाण्याचा वापर करावा. कारण यामुळे त्वचा स्वच्छ आणि हायड्रेट राहण्यास मदत होते. हे पाणी वापरल्यामुळे त्वचेवरील नैसर्गिक चमक कायम टिकून राहते. शिवाय चेहऱ्यावरील डाग, मुरुम, वय वाढल्यानंतर चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्या कमी करण्यास मदत करते. त्यामुळे बाजारात मिळणाऱ्या केमिकल प्रॉडक्टचा वापर करण्याऐवजी तांदळाच्या पाण्याचा वापर करावा.

वजन कमी करण्यासाठी प्रभावी:

वाढलेले वजन कमी करण्यसाठी अनेक महिला प्रोटीन पावडरचे सेवन करतात. मात्र या पावडरचे सेवन करण्याऐवजी तांदळाच्या पाण्याचा वापर करावा. तांदळाच्या पाण्यात कमी कॅलरीज असतात, ज्यामुळे झपाट्याने वाढलेले वजन कमी होते. शिवाय दैनंदिन आहारात तांदळाच्या पाण्याचे सेवन केल्यामुळे पचनक्रिया सुधारते, भूक कमी लागून पोटावर वाढलेली अतिरिक्त चरबी कमी होते.

त्वचेसाठी प्रभावी टोनर:

तांदळाच्या पाण्याचा वापर तुम्ही टोनर म्हणून सुद्धा करू शकता. यामुळे त्वचा फ्रेश आणि ताजी राहते. तांदळाचे पाणी टोनर म्हणून लावल्यास त्वचा हायड्रेट आणि चमकदार राहते. तांदळाच्या पाण्यात असलेल्या अँटीऑक्सिडंट्समुळे त्वचेवरील सुरकुत्या कमी होऊन त्वचा चांगली दिसते. तसेच तांदळाच्या पाण्याचा वापर तुम्ही केसांसाठी सुद्धा करू शकता. केसांच्या वाढीसाठी तांदळाचे पाणी अतिशय प्रभावी आहे. त्यामुळे कोरियन महिला दैनंदिन वापरात तांदळाच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

---

# लहान मुलांसाठी संध्याकाळच्या नाश्त्यात बनवा झटपट बटाट्याचे फ्रेंच फ्राईज, वाचा सोपी रेसिपी



लहान मुलांसह मोठ्यांना फ्रेंच फ्राईज खूप आवडतात. त्यामुळे संध्याकाळच्या नाश्त्यात तुम्ही मुलांना फ्रेंच फ्राईज बनवून देऊ शकता. हा पदार्थ झटपट लगेच तयार होतो. शिवाय कमी साहित्य लागत. जाणून घ्या सोपी रेसिपी.

लहान मुलं संध्याकाळच्या वेळी शाळेतून घरी आल्यानंतर त्यांना भूक लागते. भूक लागल्यानंतर खाण्यासाठी काय द्यावं? असा प्रश्न पडल्यानंतर पालक मुलांना बाहेरील वेफर्स किंवा इतर तेलकट पदार्थ देतात. पण नेहमी नेहमी मुलांना तेलकट तिखट पदार्थ दिल्यामुळे त्यांच्या आरोग्याचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे लहान मुलांना शक्यतो बाहेर विकत मिळणाऱ्या पदार्थांचे सेवन करण्यास देऊ नये. बाहेरील पदार्थ बनवताना कोणत्याही गोष्टींची काळजी घेतली जात नाही. एकाच तेलात अनेकदा वेगवेगळे पदार्थ तळले जातात जे आरोग्यासाठी अतिशय हानिकारक आहे.त्यामुळे आज आम्ही तुम्हाला संध्याकाळच्या नाश्त्यात लहान मुलांना भूक लागल्यानंतर लहान मुलांना देण्यासाठी सोपा पदार्थ सांगणार आहोत लहान मुलांना नाश्त्यामध्ये बटाट्याचे फ्रेंच फ्राईज बनवून द्यावे. बटाट्याचे फ्रेंच फ्राईज मुलांना खूप आवडतात. चला तर जाणून घेऊया बटाट्याचे फ्रेंच फ्राईज बनवण्याची सोपी रेसिपी.(फोटो सौजन्य-)

साहित्य:

बटाटा

थंड पाणी

मीठ

कॉर्नफ्लोर

मसाला

तेल

कृती:

फ्रेंच फ्राईज बनवण्यासाठी सर्वप्रथम, बटाटे स्वच्छ धुवून सोलून घ्या. त्यानंतर त्यांचे उभे काप करा.

२० मिनिटं बटाटे थंड पाण्यामध्ये ठेवून द्या. त्यानंतर बटाटे पाण्यातून काढून स्वच्छ कापडावर किंवा कागदाच्या टॉवेलवर ठेवून कोरडे करून घ्या.

ताटात बटाटे घेऊन त्यात चवीनुसार मीठ आणि कॉर्नफ्लोर लावून व्यवस्थित सगळीकडे पसरवून घ्या.

कढईमध्ये तेल गरम करण्यासाठी ठेवा. गरम तेलात बटाटे टाकून सोनेरी रंगाचे होईपर्यंत व्यवस्थित फ्राय करून घ्या.

तयार आहेत सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले बटाट्याचे फ्रेंच फ्राईज.

---

# अनियमित मासिक पाळीमुळे त्रस्त आहात? मग पाळी वेळेवर येण्यासाठी आहारात करा ‘या’ पौष्टिक पदार्थांचे सेवन

शरीरात सतत होणाऱ्या हार्मोन्स बदलांचा परिणाम मासिक पाळीवर दिसून येतो. ज्यामुळे अनियमित मासिक पाळी, मासिक पाळीतील वेदना इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या सॅम समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी या पदार्थांचे करा सेवन.



महिलांच्या निरोगी आरोग्यासाठी मासिक पाळी नियमित असणे आवश्यक आहे. अन्यथा महिलांचे आरोग्य पूर्णपणे बिघडून जाते. महिलांना मासिक पाळीच्या ४ दिवसांमध्ये अनेक शारीरिक आणि मानसिक समस्यांना तोंड द्यावे लागते. पण हल्लीच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि शरीरात निर्माण झालेल्या खाण्यापिण्याच्या कमतरतेमुळे महिलांना अनेक शारीरिक समस्या उद्भवतात. महिलांच्या शरीरात सतत हार्मोनल बदल होतात. शिवाय शरीरात पोषक तत्वांची कमतरता निर्माण झाल्यानंतर आरोग्य बिघडून जाते. शरीरामध्ये हार्मोन्स असंतुलन झाल्यानंतर मासिक पाळीच्या चक्रामध्ये बदल होऊ लागतो. मासिक पाळीचे चक्र बदल्यानंतर काहींना पीसीओडीचा त्रास जाणवतो तर काहींची मासिक पाळी अनियमित होते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला अनियमित मासिक पाळीच्या साम्येपासून आराम मिळवण्यासाठी आहारात कोणत्या पदार्थांचे सेवन करावे, याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.(फोटो सौजन्य- )

हळद:

हळदीमध्ये असलेले गुणधर्म आरोग्यासाठी अतिशय पोषक आहेत. दैनंदिन आहारात हळदीचा वापर करावा. शिवाय यामध्ये अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट्स आढळून येतात. शरीरातील रक्तभिसरण सुधारण्यासाठी हळद अतिशय प्रभावी आहे. अनियमित मासिक पाळीच्या समस्येने त्रस्त असलेल्या महिलांनी कोमट दुधात हळद मिक्स करून दुधाचेसेवन करावे. यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. यामुळे हार्मोन्सचे असंतुलन कमी होऊन मासिक पाळी वेळेवर येते.

पपई:

पपई खाल्यामुळे बिघडलेली पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. दैनंदिन आहारात पपईचे सेवन केल्यास शरीरातील विषारी घटक बाहेर पडून जातील आणि आरोग्याला फायदा सुद्धा होईल. यामध्ये कॅरोटीन नावाचा घटक आढळून येतो, ज्यामुळे गर्भाशयाच्या कार्यक्षमतेला चालना मिळते. तर तुमची मासिक पाळी अनियमित असेल तर आहारात पपईचे सेवन करावे. यामुळे रक्तभिसरण सुधारते.

आवळा:

आवळ्यामध्ये विटामिन सी मुबलक प्रमाणात आढळून येते. ज्यामुळे त्वचा आणि केसांना अनेक फायदे होतात. दैनंदिन आहारात आवळ्याचे किंवा आवळ्याच्या रसाचे सेवन करावे. यामुळे शरीर सुधारते. आवळ्याच्या रसाचे सेवन केल्यामुळे शरीराला ताकद मिळते आणि ऊर्जा वाढते. आवळ्याचे सेवन केल्यामुळे हार्मोनची पातळी सुधारते आणि मासिक पाळी नियमित होण्यास मदत होते.

अळशीच्या बिया:

दैनंदिन आहारात अळशीच्या बियांचे सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. अळशीच्या बियांमध्ये अनेक गुणकारी घटक आढळून येतात, ज्यामुळे मासिक पाळीच्या वेदना आणि अनियमित मासिक पाळीपासून सुटका मिळते. अळसीच्या बियांमध्ये ओमेगा-३ फॅटी ऍसिड्स मुबलक प्रमाणात आढळून येते.

तुळशीचे पाणी:

धार्मिक गोष्टींमध्ये तुळशीच्या पानांना विशेष महत्व आहे. तसेच नियमित एक तुळशीचे पान चावून खाल्यास आरोग्यसंबंधित कोणत्याही समस्या उद्भवत नाहीत. त्यामुळे एक ग्लासभर पाणी गरम करून त्यात तुळशीची पाने टाकून पाणी व्यवस्थित उकळवून घ्या. त्यानंतर उकळवून घेतलेले पाणी गाळून प्या. या पाण्याचे सेवन केल्यामुळे शरीरातील हार्मोन्सची पातळी संतुलित राहते आणि शरीराला अनेक फायदे होतात.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# वाल्मिक कराडला १५ दिवसांची पोलीस कोठडी



केज/प्रतिनिधी –तालुक्यातील मस्साजोग शिवारातील १५:एकर जमिनीवर विस्तारलेल्या आवादा ऍनर्जी कंपनीच्या अधिकाऱ्यांना २ कोटी रुपयाची खंडणी मागितल्या प्रकरणी व त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या वाल्मिक कराड याने पुणे येथील पाषाण भागातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पन केल्या नंतर त्याला केज येथे रात्री ९-३० वाजता आणण्यात आले. केज येथील उपजिल्हा रुग्णालयात अटकपूर्व वैद्यकीय तसपासणी साठी प्रथमता हजर करण्यात आले. त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज हजारे यांनी त्यांची वैद्यकीय तपासणी केली. त्यानंतर वाल्मिक कराड याला केज पोलीस ठाण्यात अधिकृत अटक करण्याची प्रक्रिया करण्यात आली. रात्री १०-४० वाजता त्याला केज येथील न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूचा उक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायाधीश पावसकर यांनी वाल्मिक कराड याला १४ जानेवारीपर्यंत एकूण १५ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. रात्री १२-१५ वाजता वाल्मिक कराड याला बीडकडे रवाना करण्यात आले

### ॲड. संतोष देशपांडे यांनी दिला नकार

केज न्यायालयातील सहाय्यक सरकारी वकील ड. संतोष देशपांडे यांची या प्रकरणी सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांनी त्याला नकार दिल्या मुले ऐनवेळी ड. जे.बी.शिंदे यांनी सरकारी वकील म्हणून काम पहिले.

### एक तास वाहतूक ठप्प.,

केज येथील पोलीस ठाणे आणि न्यायालय हे राष्ट्रीय महामार्गलागत आसल्यामुळे सुरक्षेसाठी साडे नव ते पावणे आकारा या वेळे दरम्यान या राष्ट्रीय महामार्गवरील सर्व वाहतूक ठप्प ठेवण्यात आली होती खंडिणीच्या आरोपाखाली पोलिसांच्या ताब्यात आसलेल्या वाल्मिक कराड यांच्या परळी, अंबाजोगाई परिसरातील समर्थकांनी केज येथे मोठी गर्दी केली होती. वाल्मिक कराड याला केज येथे आणले आसता, त्याला उपजिल्हा रुग्णालयात घेऊन जाताना कराड यांच्या समर्थकांनी पोलीस, व शासनाच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. नही चलेगी, नही चलेगी दादागिरी नही चलेगी या व इतर घोषणा ही त्यांनी दिल्या. त्यांना पांगविण्यासाठी पोलिसांनी त्यांना समज दिली. छत्रपती संभाजी नगर येथील सीआयडीचे पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी रात्री १०-१८ वाजता न्यायालयच्या मुख्य प्रवेश द्वारातून न्यायालयात प्रवेश केला.

## कै अण्णा साहेब पाटील प्राथमिक विद्यालयात पालक मेळावा संपन्न




लातूर :--- आज दिनांक ०१/०१/२०२४ रोजी लातूर शहर पूर्व भागातील नांदेड रोडवरील कै अण्णा साहेब पाटील प्राथमिक विद्यालयात पालक मेळावा घेण्यात आला कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून सुरुवात करण्यात आली या वेळी प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितीताना मार्गदर्शन केले पालक मेळाव्यात अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष सिकंदर गंगणे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बलभीम कोथिंबीरे,उपाध्यक्ष पी काळे,प्रा एस एम तलवारे सर , मुख्याध्यापीका श्रीमती एस बालवाड ,चंद्रलेखा गुडरे प्रा ए .एस .भुरे सर शिक्षण विभागाचे नोडल प्रमुख बोळगे सर, मुख्याध्यापक .बी.एम लोखंडे सर, बाळू वाघमारे,ए बी बनसोडे,अँड आनंद सोनवणे,दीपक गंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एस पी कदम सर,जनापुरे सर,विठ्ठल तोडगिरे,आनंद गंगणे, संजय जाधव,हरि वाघमारे, गोवर्धन गंगणे,इत्यादी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले या वेळी पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## सरपंच स्व.संतोष अण्णा देशमुख यांना टाकळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने वाहिले भावपूर्ण श्रद्धांजली



केज/प्रतिनिधी-सरपंच स्व.संतोष अण्णा देशमुख यांना टाकळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. मस्साजोगचे सरपंच स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली. केज तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यामध्ये या घटनेचे पडसाद उमटले आहेत. दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी केज तालुक्यातील टाकळी येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने स्व. संतोष अण्णा देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

## विलास सहकारी साखर कारखाना युनिट-१ चा अंतिम ऊस दर किमान ३ हजार रुपये प्रति मेट्रिक टन राहणार



लातूर : प्रतिनिधी-विलास सहकारी साखर कारखाना लि. युनिट-१, वैशालीनगर, निवळी या कारखान्यामार्फत विद्यमान गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये ऊसास पहिला हप्ता आणि किमान अंतिम ऊसदर देण्याबाबतचे धोरण मांजरा परिवाराचे मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी जाहीर केले आहे. या धोरणाप्रमाणे विलास सहकारी साखर कारखान्याकडून पहीला हप्ता प्रति टन २७०० रुपयांप्रमाणे अदा करण्यात येत असून व अंतिम ऊस दर किमान रुपये ३ हजार रुपये प्रती मे. टन प्रमाणे ऊस दर अदा करण्यात येणार आहे.

लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शन व कारखान्याचे संस्थापक, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामिणचे माजी आमदार व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख, कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांचे नेतृत्वाखाली विलास सहकारी साखर कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरु आहे.

सन २०२४-२५ चा गळीत हंगाम सुरळीत आणि पूर्ण क्षमतेने सुरु आहे. या गळीत हंगामात ३१ डिसेंबरअखेर १ लाख ७१ हजार ८४० मे. टन ऊसाचे गाळप केले असून दैनिक साखर उतारा १२.३६ टक्के व सरासरी साखर उतारा ११.२५ टक्के असून १ लाख ७६ हजार ५१० क्विंटल शुभ्र दाणेदार साखरेचे उत्पादन झाले आहे. तसेच विद्यमान गळीत हंगामात कारखाना कार्यक्षेत्रातील ऊसाचे प्राधान्याने गाळप करण्यात येत आहे, अशी माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे व कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी दिली आहे.

मांजरा परिवाराचे मार्गदर्शक, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी जाहीर केलेल्या मांजरा परीवारातील निर्णयाप्रमाणे विलास साखर कारखान्याने दि. २० डिंसेबर २०२४ प्रती टन प्रमाणे ऊस पुरवठादार शेतक-यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आलेला आहे. विद्यमान गळीत हंगामामध्ये गाळपास आलेल्या ऊसास किमान ३ हजार रुपये प्रती मे. टन प्रमाणे ऊस दर अदा करण्यात येणार आहे.

विलास कारखान्याने नेहमीच ऊस उत्पादक सभासदांच्या कल्याणासाठी कार्य केले आहे. तसेच कार्यक्षेत्रातील सभासद व बिगर सभासद यांनी विलास युनिट-१ कारखान्यास ऊस पुरवठा करण्याबाबतचे कारखाना व्यवस्थापनाच्या वतीने आवाहन करण्यात आलेले आहे. तसेच पुढील गळीत हंगामाकरिता कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणावर ऊस लागवड झालेली असून पुढील हंगामातील संपुर्ण ऊसाचे गाळपाचे सुक्ष्म नियोजन काखान्यामार्फत करण्यात येत असल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे व कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी दिली आहे.



## देशमुख कुटूंबियांनी घेतले तुळजाभवानी मातेचे दर्शन

लातूर : प्रतिनिधी

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, ट्वेंटीवन ॲग्रीच्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख, अवीर अमित देशमुख, अवान अमित देशमुख यांनी दि. १ जानेवारी रोजी दुपारी महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले.

नूतन वर्षानिमित्त देशमुख कुटुंबियांनी तुळजापूरला जाऊन श्री तुळजाभवानी मातेने दर्शन घेऊन आरती केली. यावेळी धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष धीरज पाटील, सयाजीराव देशमुख, अमर खानापुरे, सचिन पाटील, विनोद वीर, ॲड. दीपक राठोड, बुबासाहेब पाटील, रणजीत इंगळे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## तहव्वूर राणाला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

मुंबई हल्ल्यातील (२६/११) आरोपी तहव्वूर राणाला भारतात आणण्यात येणार आहे. अमेरिकेच्या न्यायालयाने भारत-अमेरिका प्रत्यार्पण करारानुसार प्रत्यार्पणाला मंजुरी दिली. त्यामुळे राजनैतिक माध्यमातून राणाला भारतात आणण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. १५ ऑगस्ट २०२४ रोजी राणाने प्रत्यार्पणाच्या निर्णयाविरुद्ध अपील केले होते, ते जिल्हा न्यायालयाने फेटाळले. त्यामुळे त्याला भारतात पाठवले जाऊ शकते, असे अमेरिकन न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले होते.मुंबई हल्ल्याच्या ४०५ पानांच्या आरोपपत्रात आरोपी म्हणून राणाच्या नावाचा उल्लेख आहे. त्यानुसार राणा हा आयएसआय आणि लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी आहे. आरोपपत्रानुसार राणा हल्ल्याचा मुख्य आरोपी डेव्हिड कोलमन हेडली याला मदत करत होता. २६ नोव्हेंबर २००८ रोजी लष्कर-ए-तोयबाच्या १० दहशतवाद्यांनी मुंबईवर हल्ला केला. त्यात १६६ लोकांचा मृत्यू झाला. ३०० जण जखमी झाले होते. मृतांमध्ये काही अमेरिकन नागरिकांचाही समावेश होता. या चकमकीत पोलिसांनी ९ दहशतवाद्यांना ठार केले आणि अजमल कसाबला अटक केली. त्याला २०१२ मध्ये फाशी देण्यात आली होती.

## द्वारकादास शामकुमारमध्ये मिस्टर व्हाईट क्लब हाऊसचा शुभारंभ



लातूर : प्रतिनिधी-कापडाच्या जगतातील वेगळेपण जपणा-या येथील द्वारकादास शामकुमारच्या वतीने खास प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभ्र रंगाचे कपडे घालणा-या व्हाईटप्रेमी नागरिकांसाठी मिस्टर व्हाईट क्लब हाऊस सुरू करण्यात आहे. या मिस्टर व्हाईट हाऊस क्लबमधून पांढ-या कपड्यांचे प्रदर्शन व विक्री सुरू झाली असून १ जानेवारी रोजी मिस्टर व्हाईट क्लब हाऊसचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे माजी आमदार वैजनाथ शिंदे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, उद्योजक दिलीप माने, लातूर जिल्हा बँकेचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य धनंजय देशमुख यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्रा. शिवराज मोटेगावकर, नाथसिंह देशमुख, बाबुराव जाधव, डॉ. राम बोरगावकर, सोनू डगवले, निलेश राजमाने, संतोष बिराजदार, आसिफ शेख, शशिकांत पाटील, सच्चिदानंद ढगे, संभाजी नवघरे, राजकुमार पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. व्हाईट हाऊस क्लबमध्ये भारतातीलच नव्हे तर परदेशातील इंटरनॅशनल ब्रँडचे कपडे ३० ते ४० टक्के कमी दरात उपलब्ध आहेत, असे गोजमगुंडे यांनी या वेळी सांगितले.

ग्रामीण भागातील ग्राहकांनाही आता इंटरनॅशनल ब्रँडचे कपडे खरेदी करणे शक्य झाल्याचे माजी आमदार शिंदे म्हणाले. क्लबमध्ये भारतातील तीनशेपेक्षा जास्त व्हरायटी ३० ते ४० टक्के कमी दरात उपलब्ध आहेत. यात रेमंड, सियाराम, अरविंद, रुबी, पोलोनिया, ग्राडो, धनलक्ष्मी, बिर्ला सेंचुरी, लिनन ओघ सोबत साउथचा प्रसिद्ध ब्रँड रामराज उपलब्ध असल्याचे द्वारकादास शामकुमारचे संचालक तुकाराम पाटील यांनी सांगितले. सोबतच मिस्टर व्हाईट क्लब हाऊसमधून कपडे खरेदी करणा-यांनासाठी अनेक ऑफर ठेवण्यात आल्या आहेत. याचा ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन द्वारकादास शामकुमारचे तुकाराम पाटील यांनी केले आहे.

## डिसेंबरमध्ये १.७७ लाख कोटींचे संकलन

नवी दिल्ली : वृत्तसंस्था-केंद्र सरकारकडून जीएसटी कलेक्शनची आकडेवारी जाहीर करण्यात आली. डिसेंबरमध्येही जीएसटी कलेक्शन १.७७ लाख कोटींपेक्षा अधिक राहिले आहे. गतवर्षीच्या जीएसटी कलेक्शनच्या तुलनेत यंदा ७.३ टक्के वाढ झाली आहे. डिसेंबर २०२३ मध्ये हे जीएसटी कलेक्शन १.६५ लाख कोटी रुपये होते. त्यानंतर नोव्हेंबर महिन्यात कलेक्शन वाढले होते.डिसेंबर २०२४ मध्ये वस्तू आणि सेवा कराच्या वसुलीत वाढ झाल्याचे पाहायला मिळाले आहे.

डिसेंबर महिन्यात जीएसटी कलेक्शन ७.३ टक्क्यांनी वाढून १.७७ लाख कोटी झाले. २०२३ मध्ये जीएसटी कलेक्शन १.६५ लाख कोटी रुपये होते. सलग दहाव्यांदा जीएसटी कलेक्शन १.७७ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाले. मात्र, एप्रिल २०२४ मध्ये जीएसटी कलेक्शन २.१ लाख कोटी रुपये झाले होते. गेल्या ३ महिन्यांतील जीएसटी वाढ कमी आहे. मात्र, गेल्या तिमाहीपेक्षा जीएसटी कलेक्शन चांगले राहिले आहे.ऑक्टोबर ते डिसेंबर या तिमाहीत जीएसटीचे कलेक्शन सरासरी १.८२ लाख कोटी राहिले. यापूर्वी जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत सरासरी कलेक्शन १.७७ लाख कोटी रुपये होते. गेल्या तिमाहीच्या तुलनेत या तिमाहीत ८.३ टक्के वाढ दिसून आली. महाराष्ट्र राज्यातून जीएसटीचे कलेक्शन सर्वाधिक झाले. महाराष्ट्रातून २९२६० कोटींचा जीएसटी जमा झाला.

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत

### 'वाचन कौशल्य कार्यशाळा व सामुहिक वाचन'उपक्रम उत्साहात




लातूर,दि.३१:- जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व साने गुरुजी शैक्षणिक संकुल लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'उपक्रमांतर्गत 'वाचन कौशल्य कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कालिदास माने यांनी केले. या कार्यक्रमाचे स्वरूप व उददेश याबाबत उपस्थितांना अवगत केले.

व्याख्याते म्हणून जेष्ठ कवी भारत सातपुते यांनी वाचनाबद्दल रुची व लेखन कौशल्य याविषयी मार्गदर्शन केले. तसेच वेगवेगळी उदाहरणे देवून चांगले जीवन जगण्यासाठी, ज्ञान वृध्दीगंत करण्यासाठी वाचनाची आवश्यकता का आहे याचे महत्व उपस्थित विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्याचबरोबर कार्यक्रमांच्या अध्यक्ष तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी वाचनाचे महत्त्व, उद्दिष्ट समजावून सांगितले. नवीन वर्षानिमित्त दररोज एक तास अवांतर वाचन करण्याचा संकल्प करावा. तसेच शासकीय ग्रंथालयातील ग्रंथसंपदेचा लाभ घेण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांनी शासकीय ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्याबाबत आवाहन केले.

कार्यशाळेत साने गुरूजी शैक्षणिक संकुलातील एकूण १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून पुस्तकाचे सामूहिक वाचन केले. प्रत्येक विद्यार्थ्यास वेगवेगळे ग्रंथ वाचनासाठी देण्यात आलेले होते. ग्रंथ वाचून त्याबाबतचे अभिप्राय विद्यार्थ्यांकडून घेतले जाणार आहेत. या कार्यक्रमास जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील सुधीर आचार्य, हि.भ पाटील, तसेच साने गुरूजी शैक्षणिक संकुलातील मुख्याध्यापक शिक्षक व इतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE